(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. X / Issue – III ISSN 2277-8063

# मराठेकालीन न्यायपध्दती : स्वरूप व विकास

**श्री. शेषनारायण वडवे** डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगांव. मो. ९९२२७८२६१३

---

**प्रस्तावना:**

अतिदक्षिणेत असलेल्या न्यायपद्धतीपेक्षा जास्त चांगली न्यायरचना मध्ययुगीन महाराष्ट्रात होतीतसेच मराठा न्यायव्यवस्थेबद्दल जास्त . राज्यकारभाराच्या इतर खात्यासारखाच न्यायरचनेवर सुद्धा बराच .तपशीलवार माहिती मिळतेमुस्लिम छाप पडलेला दिसतोपण मूलभूत . संकल्पना आणि वैशिष्टये यांचे उगमस्थान हिंदू धर्मशास्त्रातच होते तेव्हा न्यायसंस्थेमध्ये देखील हिंदू आणि .मुस्लिम परंपरांचे मिश्रण झालेले आढळते.

**मराठेकालीन न्यायपध्दतीचे स्वरुप :**

**विधिनियमांचे उगमस्थान** : के. एन. चिटणीस यांच्या मते, "हिंदू धर्मशास्त्र, मनुस्मृति, मिताक्षरा, व्यवहार. मयूख, दानकमलाकर, पराशरमाधवीयम्, चतुर्वर्गचिंतामणि ही मध्यमयुगीन महाराष्ट्रातील विधिनियमांची उत्पत्तिस्थाने होती." [1] शिवाय जातीय तंटे सोडविण्यासाठी जातीय तंटयाशी संबंधित यातीनिर्णय स्मृतिग्रंथांचा उपयोग होई . परंपरागत चालीरीती हे सुद्धा विधिनियमांचे एक उद्गमस्थान मानण्यात येई. विवाह कायदा, वारसा कायदा, मालमत्ता कायदा, दत्तक कायदा इकायद्यांचा मराठेकालीन विधिनियमात . मध्ययुगीन स्मृतिकारांचे आदेश तसेच प्रचलित स्थानिक चालीरीती यांच्या प्रभावाखाली उपरिनिर्दिष्ट विधिनियम .समावेश होत असे .अस्तित्वात आले

**न्यायरचना :** मराठा न्यायव्यवस्थेत राजसभा आणि लोकरुढ सत्ता आशा दोन प्रभावी सत्ता न्यायदानाचे काम करीत. न्यायव्यवस्थेचा प्रमुख राजा होता. केंद्रीय न्यायसभा (राजसभा) ही प्रामुख्याने राजा, प्रमुख न्यायाधीश आणि पंडितराव तसेच सरकारी अधिकारी यांची मिळून बनलेली असे .न्यायदानाचे प्रमुख आणि सर्वश्रेष्ठ अधिकार राजाकडेच असे .छत्रपती आणि त्यांची राजसभा ही एक 'अपील' करण्याचे न्यायालयच होतेराजमंडळ अथवा राजमुद्रा यात राजे .स्थानिक न्यायसभेने दिलेल्या निर्णयावर राजसभेकडे दाद मागता येई ., त्यांचे मंत्री आणि अधिकारी वर्ग यांचा समावेश होता राजमंडळाचे सदस्य .ते कायद्याचे न्यायालय म्हणून समजले जाई .छत्रपतींना न्यायदानाच्या कामात मदत करीतशिवाय राजसभेने दिलेल्या निवाड .यावर स्वाक्षरी करण्याचा अधिकार राजसभेच्या सदस्यांना असे.

गोतसभा, ब्रह्मसभा आणि जातिसभा या तीन परंपरागत लोकरुढ न्यायसंस्था होत्या. मराठेकालीन न्यायदान व्यवस्थेत त्या अत्यंत प्रभावी होत्या. खेडयातील गोत म्हणजे ग्रामीण भागातील सर्व जातीजमातींचा सहभाग असलेली व त्यांचे प्रतिनिधित्व असलेली लो-करुढ न्यायसंस्था होती त्या सभेत हिंदूप्रमाणे .मुस्लिमांनाही सहभागी होता येई. जात, पंथ, धर्म यावर आधारलेला श्रेष्ठकनिष्ठ-, उच्च नीच असा-भेदभाव न करता गावातील पाटील, कुलकर्णी, कुणबी, आलुतेबलुते-, मुसलमान, महार आणि मातंग यासारख्या अस्पृश्यांनाही गावातील वाद मिटविणाऱ्या गोतसभेच्या बैठकीस बोलावले जाई.

ब्रह्मसभा ही सामाजिक आणि धार्मिक स्वरुपाच्या तंटयावर निकाल देत असे. हिंदूंच्या पवित्र मानल्या गेलेल्या तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी विद्वान ब्रह्मणांची सभा बोलविण्यात येई. त्या सभेला ब्रह्मसभा असे म्हणत. ब्रह्मसभेच्या बैठकीला विद्वान पंडिताबरोबर परगण्याच्या सभेचे देशमुख, देसाई, पाटील, चौधरी यासारखे वतनदार, काही सरकारी अधिकारी हजार असत. या शिवाय एखाद्या महत्त्वाच्या खटल्याच्या निकाला प्रसंगी छत्रपती बैठकीस उपस्थित राहत. निरनिराळया जातींच्या जातिसभा असत आणि त्या जातीसभांमध्ये त्या त्या जातीतील अनुभवी, वयस्कर आणि तज्ञ व्यक्तींचा समावेश असे. प्रत्येक जातीतील घटकांना त्यांच्या जातीच्या परंपरागत आचाधर्माचे पालन करावे लागे. आचाधर्माचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तिस जातिबाह्य ठरवण्यात येई. वाळीत टाकण्यात येई.

**न्यायदानाची प्रक्रिया :** न्यायालयाला 'मजलिस' म्हणतवादीने खटला भरल्यानंतर त्याच्या अभियोगाच्या तपासणीसाठी मजलिसला . मजलिसच्या अध्यक्षाला .बोलाविण्यात येई'सभानायक' म्हणतपरगण्याच्या मजलिसमध्ये देशमुख हा अध्यक्ष असे तर खेड .यातील मजलिसमध्ये मोकादम, कसब्याच्या मजलिसमध्य शेटे आणि ब्रह्मसभेमध्ये धर्मधिकारी हे अध्यक्ष असतसातारा ., पाली, नाशिक या सारख्या प्रसिध्द केंद्रात परिक्षक किंवा प्राश्निक या नावाचे विशेषाधिकारी होत; पक्षकारांची व साक्षीदारांची उलटतपासणी करणे हे त्यांचे काम होते. एखाद्या अभियोगाचा न्यायनिवाडा करण्याकरिता न्यायालय एकत्र आल्यानंतर 'अग्रवादी' (plaintiff) पहिल्याने आपली बाजू मांडून त्याबद्दलचे एक लेखी निवेदन देई .याला 'तकरीर' म्हणत मग .'पश्चिमवादी' ला )defendant) बोलाविण्यात येईतो पण आपली . स्वतःची बाजू मांडून एक तकरीर न्यायालयाला सादर करीदोघांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर दोन्ही पक्षकारांना एकमेकांच्या निवेदनाला . .उत्तर देण्यास सांगण्यात येत असे'अग्रवादी' चे उत्तर )replication) आणि 'पश्चिमवादी' चे )rejoinder) दोन्हीना 'पुरसीस' म्हणतत्यानंतर . न्यायालयाचे सर्वसभासद दोन्ही पक्षांनी हजर केलेल्या पुराव्याचे निरीक्षण करून त्यांच्या अभियोगाबद्दल निर्णय घेत हा निर्णय एका .' महजर' च्या स्वरूपात देण्यात येऊन त्यावर मजलिसच्या सभासदांची नावे व हुद्दे लिहिण्यात येत.

हिंदू स्मतिकारानी जयपत्र किंवा महजरच्या स्वरूपाबद्दल काही नियम घालून दिले होतेया नियमाप्रमाणे या निर्णयकागदात वादी . आणि प्रतिवादी यांची थोडक्यात निवेदने, त्यानी हजर केलेला पुरावा, साक्षीदारांच्या साक्षीची माहिती, यावर झालेली योग्य आणि आवश्यक ती चर्चा, न्यायालयासमोर असलेल्या अभियोगाला लागू पडणारे स्मृतिग्रंथ, सभ्यांचे मत आणि शेवटी दिलेला निर्णय यांचा समावेश असावयाचानंतर प्रमख न्यायाधीशाने जयपत्रावर आपली स्वाक्षरी करून राजशिक्का मारून त्याला अधिकृत किंवा कायदेशीर . स्मृतीचे ज्ञान असलेल्या सभेतील इतर सभासदाना देखील ते न्यायाधीश म्हणून काम करीत नसले तरी .करावयाचेजयपत्रावर सही करण्यास

अनुमति असे .यामुळे त्याना सुद्धा न्यायालयीन निर्णय मान्य आहे आणि तो पूर्णपणे स्मृतीवर आधारित आहे हे आपोआपच सिद्ध होई . मराठा न्यायालयानी दिलेले निर्णय बऱ्याच अंशी मध्यमयुगीन स्मृतिकारांनी घालून दिलेल्या नियमाना अनुसरून असत, तरी त्यात काही मुसलमानी वैशिष्टये पण होती उदाहरणार्थ महजराच्या शेवटी शेवटी .'सिजिल' म्हणजे मुसलमानी न्यायालयातील निर्णय यातील काही ठराविक मजकूर होता आणि विधिनियमाबद्दलच्या संस्कृत शब्दाऐवजी फार्शी शब्दांचा वापर करण्यात आला.

मजलिसने दिलेल्या निर्णयाने किंवा तेथील कामकाजाने पक्षकारांचे समाधान झाले नाही तर वरिष्ट न्यायालयात दाद मागण्याचा त्याना हक्क होता ज्या गावातून पहिल्याने खटला भरला जाई आणि ज्या गावातील मजलिसला सर्व प्रथम अभियोग नेण्यात येई त्याला . 'मायथल' म्हणत आणि इतर ज्या गावात मजलिस असत त्याना नसते 'थल' म्हणत .थलाच्या मजलिसने दिलेल्या निर्णयाला थलपत्र म्हणत . .हे थलपत्र मायथलच्या मजलिसला सादर केल्यानंतर ते महजरच्या स्वरूपात तोच निर्णय देत असे

मराठ्यांच्या कारकीर्दीत प्रजेची अनुमति तसेच सरकारी मंजुरी यांच्यामुळे महजरला कायदेशीरपणा येईअनुमतीत मोलाची प्रजेच्या . म्हणून ते निव्वळ सरकारी .पण नंतरच्या काळात निवाडपत्राला कायदेशीर करण्याकरिता फक्त सरकारी मंजुरी पुरी झाली .संमति पण असे .लोकप्रिय मंडळाचे न्यायविषयक अधिकार आता सरकारामध्येच अंतर्भत झाले .कागद बनले

मराठा न्यायलयासमोर हजर केलेवी ‘क्रिया' म्हणजे पुरावा यात मानवी पुरावा आणि देवी पुरावा असे दोन प्रकार मोडतमानवी . पुराव्यात कागदपत्रे, भोगवटा आणि साक्षी यांचा समावेश होत असेजर एखाद्या .साधारणपणे अस्सल कागदपत्रेच हजर करण्यात येत . मालमत्तेवर किंवा वतनावर हक्क सांगणाऱ्यांच्या ताब्यातच ती मालमत्ता किंवा वतन असले तर हक्काचा कायदेशीरपणा सुलभतेने सिद्ध होई साक्षीदार हे सामान्यपणे पांढरीच्या किंवा ग्रामसंस्थेच्या सभासदापैकी असतसामान्य माणसाशिवाय मोकादम ., पाटील, बाराबलूते आणि वतनदार यांची पण साक्षीदारामध्ये गणना होईमान .वी पुरावा सत्यशोधासाठी अपुरा पडला तर किंवा तो पुरावा उपलब्धच झाला नाही तर किंवा हजर केलेल्या पुराव्याने उद्देशपूर्ति झाली नाही तर मग देवी शक्तीना शरण जातदिव्यांच्या मार्फत दैवी पुरावा उपलब्ध . करण्यात येई

दिव्याचे प्रामुख्याने अग्निदिव्य आणि जलदिव्य असे दोन प्रकार होतेअग्निदिव्याचे रवादिव्य ., लोहग्निदिव्य आणि ऐरणीदिव्य असे पुन्हा तीन उपप्रकार होते रवादिव्यात वादी तेल आणि तूप यांच्या उकळत्या मिश्रणातून अगोदर ठेवलेला धातूचा गोळा म्हणजे .' रवा' आपल्या हाताने बाहेर काढी; लोहाग्निदिव्यात तो आपल्या हातात एखादा तापलेला लोखंडी चेंड धरी, ऐरणीदिव्यात तो एका तापलेल्या ऐरणीवर आपला हात ठेवीपट्टी बांधताना .या तीन्ही दिव्यात जखमेवर लगेच पट्टी बांधण्यात येऊन तिसऱ्या दिवशी ती काढण्यात येत असे . जखम जशी होती, तशीच तिसया दिवशी पट्टी काढल्यानंतर राहिली तर त्याला व-िजयी म्हणून जाहीर करण्यात येईयाच्या उलट . जलदिव्याचे पण अनेक प्रकार असून त्यात .तिसऱ्या दिवशी जखमेत पू वगैरे आढळन आले तर तो खटल्यात हरल्याचे मानण्यात येई महत्त्वाचा प्रकार म्हणजे वादीला एका पवित्र नदीत बुडी मारून काही ठराविक मुदतीपर्यंत पवित्र वातावरणात रहायला लावीतया मुदतीत . अनिष्ट न घडल्यास तो विजयी होई काही, नाहीतर तो खटल्यात हरला जाईयाशिवाय शीतलदिव्य ., दिवादिव्य इआणखी काही दिव्ये . मध्ययुगीन स्मतिकारानी सांगितलेली दिव्ये तसेच विजयनगरकालीन दिव्ये आणि .पण क्वचितच त्यांचा अवलंब करण्यात येई .होती मराठेकाल ीन दिव्ये यात बरेच साम्य होते.

सुरुवातीला मुसलमान न्यायव्यवस्था आणि हिंदू न्यायव्यवस्था अगदी वेगवेगळया होत्याशरियतची उत्पत्तिस्थाने स्मृतिच्या . जरी .दोन्ही समाजातील न्यायदानाची प्रक्रिया वेगवेगळी होती .उत्पत्तिस्थानापेक्षा अगदी भिन्न होतीप्रारंभी या दोन्हीमधील फरक जास्त होता तरी नंतरच्या काळात हळूहळू एकमेकांच्या न्यायव्यवस्थेचा एकमेकावर प्रभाव पडल्याचे दिसतेया क्षेत्रात देखील इतर क्षेत्राप्रमाणे . मुस्लिम संस्कृतींचा एकमेकावर छाप पडून त्यांचा हितकारक संयोग झालेला दिसून-दीर्घकालावधीत हिंदूयेतो.

**मराठेकालीन न्यायपध्दतीचा विकास :**

छत्रपती शिवाजी महाराजांना न्याय म्हणजे धर्म, न्याय म्हणजे सत्याची बाजू अशा स्वरूपाचा अर्थ अभिप्रेत होताधर्म म्हणजे खरा . न्यायनिवाडा, अधर्म म्हणजे अन्याय आणि असत्याचा पक्ष ही न्यायविषयक संकल्पना स्पष्ट केलेली दिसते. छत्रपती शिवाजीराजे स्वत : पक्षपातीपणाच्या तत्त्वानुसार न्यायनिवाडा करीत असत आणि आपल्या अधिकाऱ्याने कोणत्याही प्रकारचा पक्षपाती धोरणाचा अवलंब :नि जर एखाद्या अधिकाऱ्याने न .न करता अत्यंत काटेकोरपणाने सत्याची बाजू धरुन न्यायनिवाडा करावा अशी अपेक्षा करीत ्यायदानाच्या कामकाजात एखाद्याचा पक्ष घेऊन निवाडा केला तर राजे त्या अधिकाऱ्याला कडक शब्दाचे फटकारे देत आणि त्याची कानउघाडणी करीत असत खटल्याचा निवाडा देत :अशाप्रकारच्या तंट्याचा निवाडा करण्यासाठी दोन्ही पक्षकाराना दरबारात बोलावून राजे स्वत .असल्याचे दिसून येते.

निर्भयता आणि निर्भीडता ही शिवाजी राजांच्या न्यायनीतीची खास वैशिष्ट्ये सांगता येतीलधार्मिक अथवा सामाजिक स्वरुपाचे गुन्हे . माम ुली किंवा गंभीर प्रकारचे असले तरी त्या प्रसंगी शिवाजी राजांनी निर्भय किंवा निर्भीड न्यायाधीश म्हणून भूमिका बजावली आहे. गुन्हेगार व्यक्ती ही आपली नातेवाईक अथवा मोठ्या पदावर असलेली पदाधिकारी, सरकारी अधिकारी अथवा वतनदार समजून वागविण्याची भेदाभेदाची वृत्ती मात्र त्यांनी कधीच दाखविली नाही. समाजातील सर्व व्यक्ती कायद्यासमोर सारख्याच असल्याचे समजले जाई गुन्हेगार व्यक्ती अधिकारी .असली तरी तिला गुन्ह्याबद्दल शिक्षा ठोठावली जाईशिक्षा देण्याच्या कामात कोणतीही दिरंगाई केली जात . .नसे हे सखुजी गायकवाड यांच्या उदाहरणावरून म्हणता येईल

हिंदू समाजातील जाती नियम अथवा बंधनांपेक्षा जाती खटल्यांचा निवाड्यात मराठेकालीन न्यायपध्दतीत लोकरुढ न्यायसभेचा निर्णय अंतिम मानण्यात येईखटल्यात गुंतलेल्या वादी आणि प्रतिवादी यांना लोकशाही तत्त्वांप्रमाणे त्यांच्या मर्जीनुसार त्यांना हव्या .क .असलेल्या ठिकाणी लोकरुढ न्यायसंस्थेकडे न्याय मागण्याचे स्वातंत्र्य होतेऱ्हाड परगण्यातील हिंदू मुस्लीम यांच्यातील वादाचा निवाडा लावण्यासाठी एका हिंदू पुजारी असणाऱ्या पक्षकाराने कऱ्हाड येथील धर्मसभेपेक्षा पैठण येथील ब्रह्मसभेकडे न्यायाची दाद मागितली असता त्यास पैठणच्या धर्माधिकाऱ्याकडे न्याय मागण्याची परवानगी दिल्याचे दिसून येते. छत्रपतींनी न्यायव्यवस्थेत जातीयता अथवा विशिष्ट धर्मवृत्तीचे वर्चस्व कधीही मानले नाही तसेच .त्या प्रकारची भावना त्यांच्या न्यायदान अधिकाऱ्याच्याही ठिकाणी वाढू दिली नाही. त्यांच्या न्यायनीतीला नेहमीच नैतिक तत्त्वांचे अधिष्ठान प्राप्त झाले होते

डॉ. एस. एन. सेन यांच्या मते, "छत्रपती शिवाजी महाराजानंतर त्यांच्या वारसाकडे हीच पध्दत चालू होती." [2] छत्रपती संभाजी महाराजांच्या मते, जेथे दंड देण्यालायक लोकांना दंड मिळतो येस म्हणून दमन प्रक्रियेस व शिक्षा प्रक्रि .उन्मतांचेही दमन होते (शिक्षा मिळते) ते .जाणते लोक दंडनीति म्हणतातंव्हा राजाने दंडनीतिचा स्वीकार करून, दुराचारींचा नायनाट करावामानव निर्मितीच्या जुन्या .या दंडनीत .काळापासून दंडरूपी धर्माची निर्मिती केली आहेंमुळेच राजास निर्लोभीपणे, कर्तव्यबुद्धिने, सत्यसंशोधक वृत्तीने पवित्रपणे व बुद्धिमानाकडून न्यायाची बुज राखणे शक्य झाले आहेदे .व, दानव व मानव या तींन्ही समूहातील यांनी यथाशास्त्र दंडनीतिचा उपयोग केला म्हणून सर्व जगात आनंद निर्माण झाला.अन्यथा ते प्रकोपग्रस्त राहिले असते .

छत्रपती संभाजी महाराजांच्या मते, दंडच्या प्रभावानेच संकटांची संख्या कमी होते" .अपराधाप्रमाणे दंडनियोजन व्हावे त्यात जात, पात, वर्ण, लिंग भेद करू नये". [3] संभाजी महाराजांनी दंडाचे चार प्रकार आणि दंडाची दहा स्थाने सांगितली आहेत. दंडामध्ये धिग्दण्ड(निंदा करणे) , वाग्दण्ड(समज देणे) , धनदंड अर्थदंड) ) आणि वधदंड (मृत्युची शिक्षा) यांचा समावेश होतो. तर दंडाच्या दहा स्थानामध्ये लिंग, डोळे, पोट, नाक, जीभ, दोंन्ही कान, दोंन्ही हात, संपत्ती, दोंन्ही पाय आणि शरीरयांचा समावेश केला आहे. जो राजा दंडाहार्य व्यक्तीस दंड देतो.सम्यक विचार करून वध्य माणसाचा वध करतो . सुजनांना दक्षिणा देऊन आपलेसे करतो . दुष्टांनाचा व सुजनांचा अशा तऱ्हेने तो सर्व विरोध संपवितोजो राजा दंड करण्यास योग्य नाही त्याला दंड करतो व जो दंड .ाहार्य आहे त्याला दंड करत नाही तो राजा महान अपयश प्राप्त करतो .

संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत न्यायाची रीत राहिली नव्हती .'विचार न करता शिरच्छेद करावा, सुभेदार प्रांतातील वगैरे तसेच गडकिल्ले यांचे कारभारी याजवरी हा कारभार खातो म्हणून चुगली करताच त्याचा विचार न करता त्यास आणावा, मारावा, नागवावा अंतरच असलीया शिरच्छेद करावां इत्यादी गोष्टी बखरकारांनी नमूद केल्या आहेतपरंतु प्रत्यक्षात छत्रपती शिवाजी महाराजांची न्यायाची .पद्धत संभाजी राजांच्या काळात केंद्र सरकारपासून सुभे, तर्फ पर्यंत पूर्ववत चालू होती असे आढळते .

छत्रपती शाहू महाराजांच्या कालखंडात छत्रपतीतर्फे राज्यकारभार करीत असलेल्या पेशव्याकडे सर्वोच्च न्यायालयीन अधिकार होतेत्याच्याकडे दिवाणी आणि फौजदारी या दोन्ही प्रकारच्या खटल्यांचा .तथापि न्यायाधीश हाच राज्याचा प्रमुख न्यायदंडाधिकारी होता . ज्यांना मुतालिकी शिक्का मिळालेला होता अशा सुभेदाराना प्राथम .अधिकार असे न्यायनिवाडा करण्याचाक सुनावणीचा अधिकार होताकल्याणचा सुभेदार .शिवाय काही इतर अधिकाऱ्याना त्यांच्या कर्तृत्वामुळे न्यायनिवाड्याचे काम करण्यास सांगण्यात येई ., शिवराम थने, खानदेशचा फडणीस हे अशाप्रकारचे अधिकारी होते. किरकोळ खटल्यांचा न्यायनिवाडा मुत्सद्दी नावाचे अधिकारी करीतपर .गणे, कर्यात आणि खेडयात गरजेप्रमाणे न्यायालये बोलाविणयात येतपैठण ., सातारा, पाली, पुणे, नासिक अशी काही ठिकाणे न्यायदानासाठी प्रसिद्ध होती.तमहत्त्वाचे अभियोग सामान्यतः या ठिकाणी आणण्यात ये . पेशव्यांच्या कालखंडात मात्र मराठेकालीन न्यायपध्दती सहजपणे घसरत गेल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष:**

1. मराठेकालीन न्यायसंस्थेमध्ये हिंदू - मुस्लिम परंपरांचे मिश्रण झालेले आढळते.
2. राजा हा न्यायसंस्थेच्या केंद्रस्थानी होता.
3. अपराधाप्रमाणे शिक्षा होत त्यात जात, पात, वर्ण, लिंग भेदवाचा अभाव होता.
4. मराठेकालीन न्यायसंस्था एकेरी पद्धतीची होती.

**संदर्भ ग्रंथ:**

१. डॉ. चिटणीस के. एन, 'मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग 1' प्रकाशिका, सौ. आर. के. चिटणीस, पुणे, द्वितीय आवृत्ती, 1985 पृ. क्र. 167-68

२. डॉ. सेन एस. एन, 'मराठयांची प्रशासकीय व्यवस्या', (अनु) डॉ. सदाशिव शिवदे, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जाने-2015,, पृ. क्र. 106

३. छत्रपती भोसले संभाजीराजे शिवाजीराजे, 'बुधभूषण' (अनु) प्रभाकर ताकवले, (सं) शैलज्या ज्ञानेश्वर मोळक, जिजाई प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, पुनर्मुद्रण, नोव्हें-२०१३, पृ. क्र. 269